## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१५१/२०१८/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| श्री.प्रभाकर शंकरराव गायकवाड | जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भूमि अभिलेख, मोहोळ, जि. सोलापूर | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मोहोळ, जि. सोलापूर |

### (निर्णय दिनांक-२०/०२/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक १२/१०/२०२१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी 'जन माहिती अधिकारी तथा भूमि अभिलेख मोहोळ व अधिक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांनी जाणून बुजून माहिती दिली नाही. १०४९/२०१३ अपील कामी आदेश झाला, तीन वेळा मोजणी केली पण सन १९८७ पासून सन २०१८ पर्यंत काहीच कारवाई केली नाही. केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे मागतिली असता दिली जात नाही', अशा आशयाची तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर यांनी दिनांक १०/०६/२०२२ व उपअधीक्षक भूमी अभिलेख मोहोळ यांनी दिनांक १३/०६/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये सूचित केले आहे की, ' सदरचे प्रकरणी मा. जिल्हा न्यायालय सोलापूर यांचेकडे स्पेशल सिव्हील सुट क्र. १९४/२०१४ अन्वये दावा सुरुआहे. सदरचे दाव्यामध्ये देखील तत्कालीन उपअधीक्षक भूमि अभिलेख मोहोळ यांनी सदरचे दाव्यामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.व आज रोजी सदरच्या दाव्याची सद्यस्थिती पाहता त्यामध्ये अजुन सुनावणी तारीख सुरु असलेचे दिसुन येते.एकंदरीत सदर प्रकरणी अर्धन्यायीक आहे. तसेच वरीष्ठ कार्यालयाकडुन निर्णय होणेवर शिल्लक आहे. तक्रारीबाबतची मागणी केलेली कागदपत्रे व निकाली समजविहीत कालमयदित दिली असलेचे कागदपत्राचे व अर्जदार यांना दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता दिसुन येते. अर्जदार यांची अर्जातील मागणी पाहता त्यांचे जमीन एकत्रीकरण योजनेमधील क्षेत्र कमी झाले असलेने ते दुरुस्तीबाबतचे असुन सदरची बाब ही अपीलीय स्वरुपाची अर्धन्यायीक स्वरुपाची आहे. सदरचे सुरु असणा-या कार्यवाही बाबत वेळोवेळी रितसर नोटीशीने अर्जदार व हितसंबंधीताना कळविणेत येत आहे. सदरचे अपील प्रकरण मा. उपसंचालक भूमि अभिलेख सलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे यांचेकडे सुरु आहे '

तक्रारदार यांच्या अर्जातील वस्तुस्थिती व तत्कालीन उपअधीक्षक भूमी अभिलेख मोहोळ यांनी सादर केलेला खुलासा विचारात घेता तक्रारदार यांची तक्रार प्रशासकीय स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याबाबत त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने रिव्हयु पिटीशन क्र. २३०९/२०१२ मध्ये परिच्छेद २० मध्ये खालील प्रमाणे स्पष्ट केले आहे. त्याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

"The Information Commission does not decide a dispute between two or more parties concerning their legal rights other than their right to get information in possession of a public anthority."

उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर सदरील तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षावर आयोग येत आहे. सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र. १५१/२०१८/सोलापूर / 7388/2025

दिनांक - 6/3/2025